सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा** :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005
२) महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्रा क्र.58/आरोग्य/5 दिनांक 14 मार्च 2020

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,**
क्र.आव्यप्रा कक्ष/कावि/ 123/2020.
पुणे, दिनांक :- 15/03/2020.

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा ( कोव्हीड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३, व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्यामध्ये नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जिल्ह्यातील **सर्व शॉपींग मॉल मधील सर्व दुकाने व आस्थापना ( अत्यावश्यक किराणा सामान ( Grocery), दूध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय ( Chemist Shop) वगळून ) दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्यात.** सदर आदेश साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत या आदेशाद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सुचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंड संहिता १८६०(४५) याच्या कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हाधिकारी
पुणे

( नवल किशोर राम )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१. सर्व विभागप्रमुख, ------------------, जिल्हा पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी.
२. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ----------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.
३. सर्व तालुका दंडाधिकारी, ----------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.

प्रत :- १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.